
क्र. १२४ पहिले वर्ष

१५ जानेवारी २०२३

# रविवारची  उपासना

## सामान्यकाळातील दुसरा रविवार

### प्रस्तावना

पूर्वीच्या काळात कोकरू हा समर्पणासाठी यज्ञपशू म्हणून अर्पण केला जात असे. ख्रिस्त हेच देवाचे कोकरू आहे. बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाने येशूला 'देवाचा कोकरा' म्हणून संबोधीले आहे. प्रभू येशू ख्रिस्त जगाच्या उध्दारासाठी स्वत: क्रूसावरील यज्ञबली बनला. दुसऱ्यांच्या कल्याणासाठी देह झिजविण्याची प्रेरणा आपल्याला व्हावी म्हणून ह्या मिस्साबलीमध्यें प्रार्थना करू या.

### प्रास्ताविक प्रार्थना

**आपण प्रार्थना करू या.**

स्वर्गाच्या व पृथ्वीच्या प्रभो, आमच्या प्रार्थना ऐकून घे. या जगाला शांतीकडे नेणारा मार्ग आम्हांला दाखव. ही प्रार्थना आम्ही, तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा, एकच परमेश्वर, तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

### पहिले वाचन

**यशया या पुस्तकातून घेतलेले वाचन** ४९:३,५-६

**''माझ्याकडून होणारे तारण तू दिगंतापर्यंत न्यावे म्हणून मी तुला राष्ट्रांचा प्रकाश असा नेमतो.''**

परमेश्वर मला म्हणाला, '' तू माझा सेवक आहेस, मला शोभा आणणारा तू इस्राएल आहेस.'' परमेश्वराच्या दृष्टीने मला मान मिळाला आणि तो माझा देव माझे सामर्थ्य झाला. तो परमेश्वर म्हणतो : ''याकोबच्या वंशाचा उध्दार करावा, इस्राएलच्या रक्षिलेल्या लोकांस परत आणावे म्हणून तू माझा सेवक व्हावे यात काही विशेष नाही, तर माझ्याकडून होणारे तारण तू दिगंतापर्यंत न्यावे म्हणून मी तुला राष्ट्रांचा प्रकाश असा नेमतो.''

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### प्रतिसाद स्तोत्र

**३९:२, ४अब,७-८अ, ८ब-९,१०**

**प्रतिसाद : हे परमेश्वरा, हा बघ मी आलोच!**

मी तुझ्या इच्छेप्रमाणे करण्यास आलो आहे.

१. मी धीर धरून परमेश्वराची वाट पाहिली तेव्हा त्याने माझ्याकडे वळून माझा धावा ऐकला. त्याने माझ्या मुखात नवे गीत, आमच्या देवाचे स्तोत्र घातले.

२. यज्ञपशू आणि अन्नार्पण ह्यात तुला संतोष नाही, तू माझे कान उघडले आहेत. होम आणि पापांबद्दल तू अर्पण मागत नाहीस. ह्यावरून मी म्हणालो, ''पाहा, मी आलो आहे.''

३. ग्रंथपटात माझ्याविषयी लिहून ठेवले आहे की, हे माझ्या देवा, तुझ्या इच्छेप्रमाणे करण्यात मला आनंद आहे. तुझे शास्त्र माझ्या अंतर्यामी आहे.

४. महामंडळात मी नीतिमत्वाचे सुवृत्त सांगितले. हे परमेश्वरा, मी आपले तोंड बंद ठेवले नाही हे तू जाणतोस.

### दुसरे वाचन

**पौलचे करिंथकरांस पहिले पत्र यातून घेतलेले वाचन १:१-३**

**''देव आपला पिता आणि प्रभू येशू ख्रिस्त ह्यांच्यापासून तुम्हांला कृपा आणि शांती असो.''**

करिंथ येथील देवाच्या मंडळीस, ख्रिस्त येशूमध्ये पवित्र केलेल्या आणि पवित्र जण होण्यास बोलावलेल्या लोकांस आणि आपला प्रभू येशू ख्रिस्त म्हणजे त्यांचा आणि आपलाही प्रभू, ह्याचे नाव सर्व ठिकाणी घेणाऱ्या सर्वास, देवाच्या इच्छेने ख्रिस्त येशूचा प्रेषित होण्याकरिता बोलावलेला मी पौल आणि आपला बंधू सोस्थनेस ह्यांच्याकडून : देव आपला पिता आणि प्रभू येशू ख्रिस्त ह्यांच्यापासून तुम्हांला कृपा आणि शांती असो!

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### जयघोष

**१ शमु.३:९, योहान ६:६८**

**आलेलुया, आलेलुया!**

हे परमेश्वरा, बोल, तुझा दास ऐकत आहे : सार्वकालिक जीवनाची वचने आपणाजवळ आहेत.

**आलेलुया!**

### शुभवर्तमान

**योहानलिखित शुभवर्तमानातून घेतलेले वाचन**

**१:२९-३४**

**''हे पाहा, जगाचे पाप हरण करणारे देवाचे कोकरू.''**

येशूला आपणाकडे येताना पाहून योहान म्हणाला, ''हे पाहा, जगाचे पाप हरण करणारे देवाचे कोकरू! 'माझ्यामागून एक पुरुष येत आहे तो माझ्यापुढे झाला आहे कारण तो माझ्यापूर्वी होता,' असे ज्याच्याविषयी मी म्हणालो, तो हाच आहे. मी त्याला ओळखत नव्हतो. तरी त्याने इस्राएलला प्रगट व्हावे म्हणून मी पाण्याने बाप्तिस्मा करीत आलो आहे.'' आत्मा कबुतरासारखा आकाशातून उतरत असताना आणि त्याच्यावर स्थिर राहिलेला मी पाहिला. मी तर त्याला ओळखत नव्हतो. तरी ज्याने मला पाण्याने बाप्तिस्मा करावयास पाठवले त्याने मला सांगितले होते 'ज्या कोणावर आत्मा उतरत असताना आणि स्थिर राहताना पाहशील तोच पवित्र आत्म्याने बाप्तिस्मा करणारा आहे.' मी स्वत: पाहिले आहे आणि हा देवाचा पुत्र आहे अशी साक्ष दिली आहे.

**प्रभूचे हे शुभवर्तमान**

## श्रध्दावंतांच्या प्रार्थना

**धर्मगुरू :** बंधू आणि भगिनी म्हणून ख्रिस्ताठायी आपण एकत्र जमलो आहोत. प्रभूने आपल्यावर केलेल्या अनेक उपकारांची आपण आठवण करू या. प्रार्थना करण्यास परमेश्वर आपल्याला स्फूर्ती देतो. आमच्या प्रार्थना स्वीकारण्यास आपण त्याला विनंती करू या.

**प्रतिसाद – प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. आपले पोप, फ्रान्सिस, आर्चबिशप फेलिक्स, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना झालेल्या पाचारणाद्वारे ख्रिस्तसभेची नि:स्वार्थी सेवा करण्यास परमेश्वराची कृपा मिळावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. आपल्या राजकीय नेत्यांनी कोरोना ऑमिकॉनच्या वाढत्या फैलावावर मात करण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत तसेच सद्य स्थिती हाताबाहेर न जाऊ देण्यासाठी योग्य ती उपाययोजना करावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. पवित्र मरियेच्या विनंतीवरून प्रभू येशूने काना गावी लग्नसमयी पाण्याचे द्राक्षारसात रूपांतर केले. आपल्या जीवनाचे परिवर्तन होण्यासाठी तसेच आपल्या रोजच्या जीवनातील सर्व समस्यांवर मात करण्यास आपल्याला पवित्र मरियेचे साहाय्य मिळावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. परमेश्वराच्या मळ्यामध्ये कार्य करण्यासाठी ख्रिस्तसभेला तरुण तरुणींची गरज आहे. हे कार्य अखंडीतपणे पुढे नेण्यासाठी जास्तीत जास्त उमेदवारांना प्रेरणा मिळावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. आपल्या धर्मग्रामातील सर्वांवर विशेषकरून जे आजारी आहेत अशावर प्रभूचा वरदहस्त असावा, कोरोना विषाणूपासून व सर्व नैसर्गिक आपत्तीपासून आपले रक्षण व्हावे तसेच उद्या/आज विवाहबध्द होणाऱ्या वधूवरांवर परमेश्वराचा आशीर्वाद यावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडावेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

**धर्मगुरू :**

हे स्वर्गीय पित्या, तुझ्या ख्रिस्तसभेच्या प्रार्थना ऐक. आमच्या श्रध्देमधील उणिवा तुझ्या प्रेमाने भरून काढ. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

## अर्पणावरील प्रार्थना

हे परमेश्वर बापा, आदराने व भक्तिभावनेने हा बलिदानविधी आम्हांकडून साजरा केला जावो. कारण जेव्हा आम्ही प्रभू येशूच्या ख्रिस्ताच्या मृत्यूची घोषणा करतो तेव्हा त्याचे तारणकार्य तू आम्हांमध्ये घडवित असतोस. तो परमेश्वर असून सर्वकाळ जिवंत राहतो व राज्य करतो.

## प्रसादानंतर प्रार्थना

हे प्रभो, स्वर्गीय भाकरीने तू आमचे पोषण केले आहेस. तुझ्या पवित्र आत्म्याने आम्हांला भरून टाक. शांतीने व प्रेमभावनेने आम्हांला एकत्र कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो.

## चिंतन

आजची वचने इस्राएल, प्रभू येशू ख्रिस्त व ख्रिस्तसभा ह्यांचे मिशनकार्य स्पष्ट करतात. ह्या तिघांना आपापल्या स्थलकालाच्या संदर्भात आपापले वैशिष्ट्यपूर्ण मिशन जरी असले तरी सर्वांचे सामायिक असे एक मिशन होते : सर्व लोकांपर्यंत परमेश्वराचे तारणकार्य घेऊन जाणे.

**अ) इस्राएल लोकांना राष्ट्रांचा प्रकाश होण्याचे मिशनकार्य देण्यात आलेले होते :** आजच्या पहिल्या वाचनात (यशया ४९:३,५-६), यशया संदेष्टा इस्राएली लोकांना देवाच्या नावाने संदेश देतो की त्यांनी आपले मिशनकार्य केवळ स्वत:च्याच लोकांमुळे मर्यादित ठेवू नये तर ते दिगंतापर्यंत पोहोचविण्यासाठी झटत राहावे.

**ब) जगाची पापे दूर करणे हे प्रभू येशू ख्रिस्ताचे कार्य होते :** संत योहान बाप्तिस्ता येशूचे हे मिशनकार्य पवित्र आत्म्याच्या कार्याशी जोडताना आढळते (योहान १:२९-३४). पुढे येशूच्या पुनरुत्थानानंतर जेव्हा येशू आपल्या शिष्यांना भेटला तेव्हा त्याने त्यांच्यावर फुंकर घातली, पवित्र आत्म्याचे दान दिले आणि जगाचे पाप हरण करण्याचा, पापक्षमेचा अधिकारही त्यांना दिला.

**क) ख्रिस्तसभेवर पावित्र्याचे मिशनकार्य सोपविण्यात आलेले आहे :** आजच्या दुसऱ्या वाचनात (१ करिंथ.१:१-३) संत पौल करिंथ येथल्या ख्रिस्तसभेस आपल्या मूळ पावित्र्याची आठवण करून देतो. बाप्तिस्मा साक्रामेंताद्वारे ख्रिस्तसभा आजही आपल्या लेकरांना पवित्रीकरणाच्या मिशनसाठी हाक घालीत असते.

**आत्मपरीक्षण :** ख्रिस्तसभा ही स्वभावत:च मिशनरी वृत्तीची आहे. ती सदैव मिशनकार्यावर निघालेली असते. मी त्या मिशनकार्यात कशा प्रकारे सहभागी होतो? मला माझे विशिष्ट मिशनकार्य ख्रिस्तसभेच्या सामायिक मिशनकार्याच्या प्रकाशात कशाप्रकारे पार पाडता येईल?

●●●

| जानेवारी २०२३ | दैनंदिन बायबल वाचने | दुसरा सप्ताह |
|---|---|---|
| सोम १६ | पोप सं. मारसेलूस पहिले (हि) | : इब्री.५:१-१०/मार्क २:१८-२२ |
| मंगळ १७ | सं अँथनी महान (हि/पां) | : इब्री.६:१०-२०/मार्क २:२३-२८ |
| बुध १८ | सं प्रिस्का (हि) | : इब्री.७:१-३,१५-१७/मार्क ३:१-६ |
| गुरू १९ | सं केनेथ (हि) | : इब्री.७:२५-८:१-६/मार्क ३:७-१२ |
| शुक्र २० | सं फेबियन (हि/तां) | : इब्री.८:६-१३/मार्क ३:१३-१९ |
| शनि २१ | रोमची सं आग्नेस (तां) | : इब्री.९:२-१४/मार्क ३:२०-२१ |

**डॉन बॉस्को युथ सेंटर**
सलेशियन कॅटकॅटिकल सेंटर
४ कोरेगाव पार्क, पुणे ४११ ००१
मो. ९९७५९४०६७२

**त्या प्रकाशाविषयी साक्ष देण्याकरिता**
**(योहान १:८)**
चिंतन : फा. रॉबर्ट डिसोझा वसई
(खाजगी वितरणासाठी)